# वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट

## अंक १३ वा

## दिनांक २३/०३/२०२० ते दिनांक २७/०३/२०२०

## पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.

## जावक क्रमांक:-२३३२ दिनांक:-२८/०४/२०२०

---------------------------------------------------------------------------------------------------

**भाग- १ :-**

**बदली :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/मपोशि-१८४, प्रिती पालवे/बदली/२००५/२०२० वाशिम दिनांक २४/०३/२०२० अन्वये मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे पत्र क्रमांक अप/कक्ष-४/मपोशि-१८४/पालवे-अर्ज/२०२०/१२७०, दिनांक ०५/०३/२०२० अन्वये मपोशि/१८४, प्रिती पालवे, नेमणुक पोलीस स्टेशन आसेगांव यांची पोलीस स्टेशन आसेगांव येथुन पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे त्वरीत प्रभावाने बदली करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पोहवा-५४, जनार्दन+२/बदली/२०३३/२०२० वाशिम दिनांक :- २८/०३/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची हे पोस्टे शिरपुर येथे नेमणुकीस असतांना त्यांची कोरोना महामारी प्रतिबंध म्हणुन वाशिम जिल्हा लॉकडाऊन व संचारबंदी उदेशाने पोस्टे शिरपुर हददीत लावण्यांत आलेल्या पिंपरी सरहदद चेक पोस्टे येथे दिनांक २७/०३/२०२० रोजी डयुटी असतांना पिंपरीसरहदद चेक पोस्ट येथुन एक ट्रेम्पो ट्रॅव्हल्स वाहनामधुन काही पुरुष/महिला यांचेवर प्रतिबंध कार्यवाही न करता तसेच त्यांचे वैदयकीय तपासणी न करता त्यांना सदर मार्गावरुन जाऊ दिले. तसेच इतरही वाहनास सदर मार्गाने जाऊ दिले असल्याचे वरिष्ठांच्या निदर्शनास आले आहे या आपल्या कसुरीबाबत आपणास आपले नावासमोर दर्शविल्याप्रमाणे त्वरीत प्रभावाने बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचाऱ्यांचे नाव व हुददा | सध्याची नेमणुक | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/५४, जनार्दन शेवाळे | पो.स्टे. शिरपुर | पो.स्टे. मानोरा |
| २. | पोशि/३३३, गजानन खंदाळे | पो.स्टे. शिरपुर | पो.स्टे. धनज |
| ३. | पोशि/५१२, प्रभु जुमळे | पो.स्टे. शिरपुर | पो.स्टे. कारंजा ग्रामीण |

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**

**रजा :- निरंक**

**परवानगी :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाख/पोउपनि प्रमोद सोनवणे/बदली/२०३४/२०२० वाशिम दिनांक २८/०३/२०२० अन्वये पोलीस उप निरीक्षक, प्रमोद सोनवणे, नेमणुक पोलीस स्टेशन मंगरुळपीर यांची कसुरी अहवालावरुन पोस्टे मंगरुळपीर येथुन पोलीस नियंत्रण कक्ष, वाशिम येथे पुढील अदेशापर्यत तात्पुरते स्वरुपात तैनात करण्यांत येत आहे.

**भाग -३ :-**

**बढती :- निरंक**

**पगार:- निरंक**

**भाग -४ :-**

**बक्षिस:- निरंक**

**भाग -५ :-**

**शिक्षा :- निरंक**

**निलंबन :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौशाखा/पोशि-१४६७, गणेश/निलंबन मुक्त/२०१८/२०२० वाशिम दिनांक २७/०३/२०२० अन्वये पोशि/१४६७, गणेश बर्गे, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे विरुध्दचे प्राथमिक चौकशी प्राप्त झालेली असल्याने त्यांना सदर चौकशीच्या अधिन राहुन निलंबनातुन मुक्त करण्यांत येत असुन त्यांची नेमणुक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन आसेगांव येथे करण्यांत येत आहे. त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय प्राथमिक चौकशी /खातेनिहाय शिस्तभंग विषयक कारवाईच्या अधिन राहुन स्वतंत्र आदेशाव्दारे यथावकाश निर्गमित करण्यांत येईल.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पोना-६७०, वासुदेव/निलंबन मुक्त /२००४/२०२० वाशिम दिनांक :- २४/०३/२०२० अन्वये नापोशि/६७०, वसुदेव चव्हाण, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे विरुध्दचे प्राथमिक चौकशी प्राप्त झालेली असल्याने त्यांना सदर चौकशीच्या अधिन राहुन निलंबनातुन मुक्त करण्यांत येत असुन त्यांची नेमणुक राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम येथे करण्यांत येत आहे. त्यांच्या निलंबन कालावधीबाबतचा निर्णय प्राथमिक चौकशी/ खातेनिहाय शिस्तभंग विषयक कारवाईच्या अधिन राहुन स्वतंत्र आदेशाव्दारे यथावकाश निर्गमित करण्यांत येईल.

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण व इतर :-**

**प्रशिक्षण:- निरंक**

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्थालि./प्रो.भत्ता-समिती/१९९६/२०२०. वाशिम. दिनांक :- २३/०३/२०२० अन्वये पोलीस बलातील विहीत शारिरीक क्षमताधारक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याचे अनुषंगाने समिती गठीत करण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभाग निर्णय क्रमांक.पीडब्ल्युएफ/१२०४/१४३/प्र.क्र./पोल-७, दि.०६-११-२००६ नुसार (महाराष्ट्र राज्यात) आपले वाशिम जिल्हा पोलीस दलातील विहीत शारिरिक क्षमताधरक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याकरिता सन २०१९-२० करीता प्रोत्साहनभत्ता योजना राबविण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे समिती गठीत करण्यांत आली होती.

| | |
|---|---|
| पोलीस अधीक्षक, वाशिम | - श्री वसंत परदेशी, अध्यक्ष. |
| अपर पोलीस अधिक्षक, वाशिम | - श्री विजयकुमार चव्हाण उपाध्यक्ष. |
| पोलीस उपअधीक्षक, आर्थीक गुन्हे शाखा, वाशिम तथा (अति. कार्यभार) पोलीस उपअधिक्षक (मख्या.), वाशिम | - श्रीमती मृदुला लाड, सदस्य सचिव. |
| पोलीस निरीक्षक- कल्याण शाखा, वाशिम | - श्री शिवाजी ठाकरे, सदस्य. |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आशा -४/ श्वान पथक/श्वान खादय/देयक/माहे फेब्रुवारी/मार्च-२०२०/मंजुर/२०२०/२०३१/ वाशिम :- २७/०३/२०२० अन्वये श्वान पथक वाशिम येथील श्वानांचे माहे फेब्रुवारी-२०२० व माहे मार्च २०२० चे औषध व खादय बिल देयक एकुण रुपये १५,६९२/- (रु. पंधरा हजार सहाशे ब्यानऊ रुपये फक्त) चे पत्र या कर्यालयात प्राप्त झाले आहे. सन २०१९-२०२० चे वित्तीय वर्षामध्ये इतर खर्च या उपलेखशिर्षाखाली मंजुर करण्यात येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/आलि.-२/प्रोत्सा.भत्ता//२०१९-२०२०/२००९/२०२०, वाशिम. दिनांक २६/०३/२०२० अन्वये पोलीस दलातील विहीत शारीरिक क्षमताधार पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता योजना राबविण्याबाबत. (वित्तीय वर्ष २०१९-२०२० करिता) पोलीस अधिक्षक, वाशिम यांचे आस्थापनेवरील नेमणुकीस असलेल्या सोबत जोडलेल्या यादीतील पात्र एकुण-८५० पोलीस कर्मचारी व एकुण-३६ पोलीस अधिकारी असे एकुण -८८६ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शारिरीक क्षमताधारक हे संदर्भीय शासन निर्णयात नमुद अटी व शर्तीच्या नुसार दरमहा रु. २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) प्रोत्साहन भत्यासाठी पात्र ठरलेले असल्साने त्यांना सन २०१९-२०२० ( दिनांक ०१ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२०) या वित्तीय वर्षासाठी मासिक प्रोत्साहन भत्ता प्रत्येकी दरमाहा रुपये -२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) प्रमाणे त्यांचे वेतनासोबत देण्यास मंजुरी देण्यांत येत आहे. २/- सदर खर्च वेतन या लेखाशिर्षाखाली प्राप्त वित्तीय वर्ष २०१९-२०२० करीता प्राप्त अनुदानातुन भागविण्यात यावा. सहपत्र :- पात्र/अपात्र असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची यादी (०१ ते ३३ पाने) वाशिम जिल्हा पोलीस यांच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आलेले आहे.

**Sd/-**
**( वसंता परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक १३ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे.तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

-----ooooo-----